पीपीसी/ 811B

दिनांक : 30/9/2010

परिपत्रक

प्रति,
मुख्याध्यापक
सर्व भाषिक शाळा

विषय : बृ.म.न.पा. शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती / पालक शिक्षक संघ स्थापन करणेबाबत

संदर्भ : पी.आर.ई.२०१०/प्र.क.२१७/प्रशि.१ दि.१७जून २०१०

केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१(अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे.त्यानुसार ६ते१४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम २००९ (No.३५,२००९) केंद्र शासनाने पारित करुन तो भारत सरकारच्या २७.०८.२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे.तसेच भारत सरकारच्या दि.१६.०२.२०१०च्या राजपत्रात सदर अधिनियम दि.०१.०४.२०१०पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मीर वगळता ) लागू केला असल्याचे नमूद केले आहे.

शिक्षणाच्या विकासात लोकसहाभाग रहावा या दृष्टीने बृ.म.न.पा. च्या प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती (पालक शिक्षक संघ ) स्थापन करणे आवश्यक आहे. शाळेच्या भौतिक, शैक्षणिक विकासाच्या बाबतीत उपरोक्त समिती उपयुक्त ठरतील.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अनुसार विना अनुदानित शाळा वगळता उर्वरीत सर्व शाळांसाठी शाळा व्यवस्थापन समिती ३० सप्टेंबर २०१० पूर्वी गठीत करणे अनिवार्य झाले आहे.

शासन निर्णय

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील भाग चार कलम (२१) अनुसार प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे अनिवार्य राहील.

<u>शाळा व्यवस्थापन समितीच्या रचनेच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे असतील.</u>

१. सदर समिती किमान १२ ते १६ लोकांची राहील (सदस्य सचिव वगळून )
२. यापैकी किमान ७५ % सदस्य बालकांचे आई वडील पालक यामधून असतील.
   अ) पालक सदस्यांची निवड पालक सभेतून करण्यात येईल.
   ब) उपेक्षित गटातील आणि दुर्बल घटकातील बालकांच्या मातापित्यांना प्रमाणशीर प्रतिनीधीत्व मिळेल असे पहावे,
   क) साधारणपणे पालक सदस्यांची निवड करताना प्रत्येक इयत्तेतील बालकांच्या पालकांना प्रतिनिधीत्व मिळेल असे पहावे.
३. उर्वरित २५ % सदस्य पुढील व्यक्तीपैकी असतील.
   अ) स्थानिक प्राधिकरणाचे निवडून आलेले प्रतिनीधी - एक
   ब) शाळेच्या शिक्षकांमधून शिक्षकांनी निवडलेले शिक्षक - एक
   क)पालकांनी पालक सभेत निवडलेले स्थानिक शिक्षकतज्ञ बालविकास तज्ञ -एक

४.वरील अ.क्र. २ मधील बालकांचे आईवडील / पालक सदस्यांमधून , सदर समिती अध्यक्ष व उपाध्यक्ष याची निवड करतील.

५.शाळेचे मुख्याध्यापक / प्रभारी मुख्या.या समितीचे पदसिध्द सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

६. या समितीतील एकुण सदस्यांपैकी ५० % सदस्य महिला राहतील.

१) शाळेची ध्येय व उद्दीष्टांच्या परिपूर्तीसाठी सहकार्य करणे.

२) वार्षिक नियोजन, शालेय विकास आराखडा तयार करुन त्याची शिफारस करणे.

३) त्या शाळेस शासनाकडून / स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने शाळेस प्राप्त होणाऱ्या निधीच्या विनियोगावर देखरेख ठेवणे.

४) बालकांचे हक्क सर्वांना समजावून सांगणे व या संदर्भातील पालक शाळा स्थानिक प्राधिकरण राज्यशासन यांच्या जबाबदाऱ्यांबाबत महिती देणे.

५) शिक्षकांच्या कर्तव्यांचा पाठपुरावा करणे व त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे अन्य अशैक्षणिक कामांचा बोजा शिक्षकांवर पडणार नाही याचे सनियंत्रण करणे.

६) बालकांची १००% पटनोंदणी व १००% उपस्थिती यामध्ये सातत्य राहील यासाठी दक्षता घेणे.

७) शाळाबाह्य व अपंग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व शाळेत टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे.

८) शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे, त्यांच्या अध्ययन सुविधांचे संनियंत्रण करणे व शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे.

९) शाळेतील मध्यांन्ह भोजन कार्यक्रमाचे संनियंत्रण करणे.

१०)शाळेसाठी पायाभूत भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणे तसेच किरकोळ व विशेष दुरुस्त्यांवर देखरेख करणे.

११) निरुपयोगी साहित्य रुपये १०००/-(रुपये एक हजार मात्र) किंमती पर्यंतच्या साहित्याचा लिलाव करणे.

१२) शिक्षकांची अनियमितता, गैरवर्तन, वारंवार अनुपस्थिती याबाबत संबधित शिक्षकांशी समक्ष चर्चा करुन किंवा लेखी स्वरुपात सूचना देणे व त्यांच्या वर्तनात सुधारणा न झाल्यास त्या बाबतचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविणे.

१३) या समितीची महिन्यातून एकदा सभा व्हावी सभावृत्तांत जतन करण्यात यावा.

१४) तातडीच्या सभेची गरज भासल्यास ३०% किंवा ४० % समिती सभासदाची उपस्थिती आवश्यक असेल.

१५) शिक्षणात पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

सदर शाळा व्यवस्थापन समितीस आवश्यक ते प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी संबधित प्र.अ.(शाळा) यांची राहील.

शिक्षणाधिकारी

सर्व उपशिक्षणाधिकारी
सर्व अधिक्षक
सर्व प्र.अ.(शाळा)
सर्व विभाग निरिक्षक
सर्व समाज विकास अधिकारी
सर्व कनिष्ठ पर्यवेक्षक

प्रमुख अधिकारी
लोक सहभाग कक्ष